NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक १७.१०.२०२६ शनिवार

कुख्यात ड्रग्ज तस्कर सुमित उर्फ नमो बंडू मेश्राम पीट एनडीपीएस ॲक्ट, अंतर्गत स्थानबध्द :–

स्थानबध्द प्राधिकारी आणि पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी दिनांक १६.१०.२०२६ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे लकडगंज आणि हुडकेश्वर, नागपूर शहरचे हददीत गुन्हे करणारा कुख्यात ड्रग्ज तस्कर नामे सुमित उर्फ नमो बंडू मेश्राम, वय ३२ वर्षे, रा. प्लॉट नं. ७९, स्विपर कॉलनी, गंगाबाई घाट, पो. ठाणे लकडगंज, नागपुर यास पीट एनडीपीएस ॲक्ट– १९८८ अंतर्गत दिनांक १६.१०.२०२६ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक १६.१०.२०२६ रोजी आदेशाची बजावणी करून येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सुमित उर्फ नमो बंडू मेश्राम याचेविरूध्द पोलीस ठाणे पोलीस ठाणे लकडगंज आणि हुडकेश्वर, नागपूर शहर येथे जबरी चोरी करणे, गैर निरोध करणे, दरोडयाची तयारी करणे, दरोडा टाकण्याच्या उददेशाने एकत्र जमणे, घातक हत्यारांनी इच्छापूर्वक दुखापत पोहोचवणे, अश्लिल भाषेमध्ये शिवीगाळ करणे, अपराधीक जिवे ठार मारण्याची धमकी देणे, प्राणघातक शस्त्रानिशी आणि अग्निशस्त्रासह फिरणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी गुन्हे सन २०१२ पासुन करीत आहे. शिवाय एम.डी. (मेफेड्रोन) या मन:प्रभावी पदार्थांची खरेदी, विक्री आणि बाळगणे, हद्दपारी आणि प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द गुन्हेगारी कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०३, नागपूर शहर यांनी सन २०१२ मध्ये दोन वर्षाकरिता नागपूर शहर व नागपूर ग्रामीण हददीतुन हदद्पार केले होते. त्यानंतर पोलीस ठाणे लकडगंज अंतर्गत सन् २०२१, २०२२ व २०२४ मध्ये कलम ११०(ई)(ग) सीआरपीसी अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात येऊन त्याचेकडून बंधपत्र घेण्यात आले होते. तरीही त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. केलेल्या प्रतिबंध कारवाईचा त्याचेवर कोणताही परिणाम झाला नाही व त्याने सतत गुन्हे करणे सुरूच ठेवले. अलीकडील काळात पोलीस ठाणे लकडगंज व हुडकेश्वर येथे मन:प्रभावी अंमली पदार्थ (एम.डी.) बाळगणे आणि विक्री करणे इत्यादी अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे केलेले आहेत. स्थानबध्द इसमाचे अवैध ड्रग्स व्यापारात आणि समाजविघातक कारवायांमधील सहभागामुळे, परिसरातील नागरिक, विशेषत: तरुण, ड्रग्सचे व्यसनाधिन होत आहेत, ज्यामुळे समाजात अशांतता पसरत आहे आणि कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. शिवाय, किशोरवयीन मुलांसह तरुणही ड्रग्सच्या प्रभावाखाली गुन्हे करत आहेत आणि ड्रग्स खरेदी करण्यासाठी शरीराविरूध्द आणि मालमत्तेच्या गुन्ह्यांमध्येही सामील होत आहेत. त्याच्या सततच्या गुन्हेगारी कारवायांमुळे, विशेषत: लकडगंज आणि हुडकेश्वर परिसरात आणि सर्वसाधारणपणे नागपूर शहरात सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे त्याचे बेकायदेशीर ड्रग्स व्यापाराला आळा घालण्यासाठी पीटएनडीपीएस ॲक्ट, १९८८ अंतर्गत, पोलीस

निरीक्षक, पो. ठाणे लकडगंज, नागपूर शहर यांनी स्थानबध्द प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार दिनांक १६.१०. २०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांनी पीट एनडीपीएस अंतर्गत स्थानबध्द आदेश पारित केला.

यापूर्वी पीट एनडीपीएस कायदयातंर्गत नागपूर शहर पोलीसांनी शासनास प्रस्ताव पाठविला असता, सन् २०२३ व २०२५ मध्ये नागपूर शहरातील दोन सक्रीय ड्रग्ज तस्करांविरूध्द शासनाकडून स्थानबध्द आदेश पारित करण्यात आले होते. विशेष म्हणजे सन् २०२३ मध्ये पीट एनडीपीएस अंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई महाराष्ट्रात नागपूर शहर पोलीस आयुक्तालय यांनी केली होती. सन् २०२६ मध्ये पीट एनडीपीएस कायद्यातंर्गत पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना राज्य शासनाकडून पीट एनडीपीएस अंतर्गत स्थानबध्द करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. त्यानुसार पीट एनडीपीएस कायद्यातंर्गत पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी केलेली नागपूर शहरातील पहिली स्थानबध्दतेची कारवाई असुन, मा. पोलीस आयुक्त यांचे ड्रग्स मुक्त नागपूर ही संकल्पना राबवुन नागपूर शहरातील मादक पदार्थाची तस्करी करणाऱ्या ड्रग्स माफियांवर नजर ठेऊन, त्यांचेवर सुध्दा यापुढे अशा प्रकारची कारवाई करण्यात येईल. या अनुषंगाने नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात अवैध अंमली पदार्थ तस्कर यांची यादी तयार करण्यात आलेली असून, त्यांचे मागील दूवे व पुढील दुवे शोधुन त्यांचेवर सुध्दा स्थानबध्दतेची तसेच, म.को.का. अंतर्गत कारवाई करण्याची योजना आहे. कोणत्याही अवैध अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.



(कामगिरी)

<u>वाडी पोलीसांची कामगीरी :– कारखान्यात चोरी करणाऱ्या आरोपींना २४ तासाचे आंत अटक.</u>

फिर्यादी स्वप्नील संजय मुकटे, वय ३७ वर्षे, रा. मुंशी मंदीर रोड, महाल, कोतवाली, नागपुर यांचा पोलीस ठाणे वाडी हद्दीत, पिएच नं. ६, वडधामना, वाडी, नागपूर येथे ''सिग्नम फायर प्रोटेक्शन (इंडीया) प्रा. लिमीटेड'' नावाचे कंपनीचा कारखाना आहे. दिनांक १५.१०.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक १६.१०.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे कारखान्याचे शटरचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, कंपनीतील कॉपरपट्टी रोल, स्क्रॅप, वेगवेगळ्या डाय व ईतर साहीत्य असा एकुण किंमती १,०९,८००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. तसेच, कारखान्यातील सिसिटीव्ही कॅमेरे, खिडकीचे काच व ईतर साहीत्याची तोडफोड करून नुकसान केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४), ३२४(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान वाडी पोलीसांचे तपास पथकानी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले. व आरोपी क्र. १) साहील ताराचंद पाचे, वय २० वर्षे, २) प्रेम सागर दुपारे, वय २१ वर्षे, ३) संजयकुमार ओमप्रकाश चव्हाण, वय २८ वर्षे, ४) शुभम राजु नित, वय २८ वर्षे, ५) राहुल पिलुराम भैसवारे, वय २६ वर्षे, ६) राहुल रामु पवार, वय २७ वर्षे, सर्व रा. वडधामना, वाडी, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेला बजाज प्रवासी ऑटो क्र. एम.एच ४९ ए.आर ०६९० व ऑटोमध्ये चोरी केलेला संपुर्ण मुद्देमाल, तसेच आरोपींचे ०४ मोबाईल असा एकुण २,४६,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. वाडी पोलीसांनी २४ तासाचे आंत गुन्हा उघडकीस आणुन गुन्ह्यातील संपुर्ण मुद्देमाल जप्त केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, सपोनि. उत्तम जायभाये, पोहवा. नागेश्वर दासरवार, विजय वायदुडे, राहुल नागदेवे, चंद्रकुमार टेकाम व पोअं. दिलीप बाजड यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे जरीपटका :—शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.१०.२०२६ चे ०३.३० चे सुमारास, जरीपटका पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, भारत पेट्रोल पंपाजवळील बॅक ऑफ बडोदा समोर एक इसम शस्त्र घेवुन धुमाकुळ घालीत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विशेष उर्फ बिट्टु प्रफुल्ल मनोरे, वय २० वर्षे, रा. ईटारसी पुलीया जवळ, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किंमती २५०/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगून धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सर तर्फे फिर्यादी पोअं. नितेश नागपुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कौशल्या बाबर यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे मानकापुर :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १६.१०.२०२६ चे ०६.२० वा. चे सुमारास, फिर्यादी सौ. भावना आनंद वाघमारे, वय ४२ वर्षे, रा. आंबेडकर सोसायटी, न्यु मानकापुर, नागपूर ह्या त्यांचे पती नामे आनंद पंजाबराव वाघमारे, वय ४४ वर्षे यांचेसह त्यांचे कार क्र. एम.एच ३१ एफ.आर ३२९७ ने पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, कल्पना टॉकीज चौक, मानकापुर येथुन जात असतांना, एका कंटेनर ट्रक क्र. आर.जे ११ जे.सि ९३५२ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पतीचे कारला धडक मारून, फिर्यादीस किरकोळ व त्यांचे पतीस गंभीर जखमी केले. गंभीर जखमी फिर्यादीचे पतीस उपचाराकरीता कुणाल हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पो.हवा. रविकांत सिंग ९८२३९९२४४४ यांनी आरोपी कंटेनर ट्रक चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– फिर्यादी आकाश रमेश प्रजापती, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. २११, बिल्डींग नं. ३, बांबुवन नगरी, टेक ऑफ सिटी, उमरेड रोड, हुडकेश्वर नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांचे वडील नामे रमेश प्रजापती, वय ७८ वर्षे हे दिनांक २३.०८.२०२६ चे ०९.४० वा. पासुन आपले राहते घरून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट १ इंच, केस–पांढरे, अंगात– गुलाबी शर्ट व खाकी पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी, मराठी बोलतात.

२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– फिर्यादी श्रीमती छाया दिपक उचितकर, वय ४२ वर्षे, रा. गल्ली नं. ३, राम किराणा स्टोअर्स जवळ, तुकडोजी पुतळा चौक, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे सोनु दिपक उचितकर, वय २५ वर्षे हा माहे जानेवारी २०२६ पासुन आपले राहते घरून बेपत्ता आहेत. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ११ इंच, केस–काळे, अंगात– पांढरा शर्ट व काळा पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी, मराठी बोलतो.



रमेश



सोनु

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	२३२७/२०२१	कलम ४, २५ भा.ह.का.	रूपेश किसन शेंडे, रा. ताज किराणा जवळ, खिल्लारे चे गल्लीमध्ये, इंदीरा नगर, ईमामवाडा, नागपूर.	२२.१०.२०२६
२	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ८, नागपुर.	७६३८/२०१३	कलम २९४ भा.दं.वि.	१) कविता सुनिल खंडागळे, रा. प्लॉट नं. १२, सेनापती नगर, शिवमंदीर जवळ, दिघोरी, नागपुर. २) सोनु निलेश तायडे, ३) अनुसया राजेश धवलार, दोन्हीही रा. नायगांव, जलालखेडा, तह. नरखेड, जि. नागपूर.	२३.१०.२०२६
३.	मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०२०८१/ २०१४	कलम ३२३, ३२४ भा.दं.वि.	प्रशिद श्रिबाबु नाईक, रा. साईबाबा नगर, रिलायन्स कंपनीचे टॉवर जवळ, खरबी, वाठोडा, नागपूर.	०३.११.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखेची प्रेसनोट–१

नागपूर शहरात ''नवरात्र उत्सव'' हा दिनांक ११.१०.२०२६ ते २२.१०.२०२६ पर्यंत साजरा होणार असून देवी मुर्तीचे विसर्जन शहरातील फुटाळा तलाव, कोराडी तलाव, पोलीस तलाव, गोरेवाडा रिंग रोड येथील कृत्रीम तलावात करण्यात येणार असल्यामूळे दुर्गा विसर्जनाचा सोहळा पाहण्यास भाविकांची गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. वाहतूक सुरळीत रहावी व सामान्य नागरिकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतूक नियमन करण्याचे दृष्टीने अधिसुचना निर्गमीत आहे.

–: **वाहतूकीचे नियोजन :–**

१. फुटाळा तलाव.:–

१) पुर्व नागपूर हद्दीतील सी.ए.रोडने फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या दुर्गा मुर्ती ह्या रामझुला मार्गे जयस्तंभ चौक, श्रीमोहिनी कॉम्पलेक्स, एलआयसी चौक, साधु वासवानी मार्गे लिबर्टी टी पॉइंन्ट, सी.के.नायडू चौक, सदर पोलीस स्टेशन, जपानी गार्डन चौक, वेस्टर्न कोलफिल्ड कार्यालय, दुध डेअरी, तेलंगखेडी हनुमान मंदिर ते फुटाळा तलाव येथे जातील. दुर्गा देवी मुर्ती ठेवलेल्या वाहना व्यतिरीक्त इतर वाहनांना तेलंगखेडी हनुमान मंदिरापासून फुटाळा तलावाकडे प्रवेश बंद करण्यात येत असून सदरची वाहने तेलंगखेडी येथील हनुमान मंदीर समोरील मत्स्य विज्ञान महाविद्यालय जवळून शिवमंदीर कडे तसेच त्याच महाविद्यालयापासून सि. पी. क्लब कडे जाणारे दोन्ही बाजुला निश्चित केलेल्या ठिकाणी पार्क करावीत.

२) वायुसेना कमांड प्रवेश द्वार कडून फुटाळा तलाव या मार्गावरील सर्व प्रकारचे वाहतूकीवर परिस्थिती नुसार निर्बंध घालण्यात येत आहे.

३) कॉटन मार्केट मार्गे फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या दुर्गा मुर्ती ह्या कॉटन मार्केट चौक, लोहापूल, मानस चौक, मॉरिस टी पॉइंन्ट, व्हेरायटी चौक, महाराजबाग चौक, भोले पेट्रोलपंप चौक, लॉ कॉलेज चौक, रविनगर चौक ते भरतनगर चौक येथून फुटाळा तलाव येथे जाईल.

४) अमरावती रोड कॅम्पस चौक ते फुटाळा तलाव कडे जाणारे मार्गावरील सर्व प्रकारचे वाहतूकीस परिस्थिती नुसार निर्बंध घालण्यात येत आहे..

५) फुटाळा वस्तीतील एकूण ०६ गल्ल्यामधून फुटाळा तलाव कडे येणारे सर्व प्रकारचे वाहतूकीवर आवश्यकतानुसार निर्बंध घालण्यात येत आहे..

७) **मनिष नगर भागातुन दुर्गा देवी विसर्जना करीता येणारी मंडळे :–** सोमलवाडा चौक– राजीवनगर टी पॉईन्ट– कोकाकोला चौक– स्नेहनगर चौक– छत्रपती नगर चौक डावे वळण– सावरकरनगर चौक– आठ रस्ता चौक– शंकरनगर चौक– रविनगर चौक या मार्गाने फुटाळा तलाव येथे येतील.

८) तेलंगखेडी टी पॉईंट व भरतनगर टी पॉईंट कडून दुर्गा देवी मुर्ती घेवून येणारी दुचाकी वाहने फुटाळा तलावाचे रस्त्यावरील पुर्व बाजुस असलेल्या मोकळ्या जागेत उपलब्ध असलेल्या पार्कींग मध्ये पार्क करतील व त्यांचे दुर्गा देवी मुर्तीचे विसर्जन करून लगेच वाहने घेवून निघुन जातील.

९) **सहकार नगर भागातुन दुर्गा देवी मुर्ती विसर्जना करीता येणारी मंडळे :–** खामला चौक–सावरकर नगर चौक– आठ रस्ता चौक– शंकरनगर चौक– रविनगर चौक या मार्गाने फुटाळा तलाव येथे येतील

१०) छिंदवाडा रोड कडून नागपूरकडे जाणारी जड वाहतूक दहेगाव मार्गे खापरखेडा मार्गे आशा हॉस्पिटल कामठी रोडकडे जातील.

११) कामठी कडुन छिंडवाडा कडे जाणारी वाहतुक आशा हॉस्पीटल समोरून खापरखेडा, दहेगांव ते सावनेर कडे जातील.

१२) वर्धा ते नागपूर (महामार्ग क्र ४४) येणारी जड वाहने नागपूर शहरात प्रवेश बंदी करण्यात येत आहे. छिंदवाडा व अमरावती कडे जाणारी जड वाहतुक १) सावनेर कडुन आउटर रिंग रोड २) जामठा वाय पाईंट ते भंडारा राष्ट्रीय महामार्ग (जबलपुर हायवे) या मार्गाचा वापर करतील.

वरील अनु क्र. १ ते ९ या मार्गाने फक्त दुर्गा देवी मुर्ती घेवून येणारी हलकी वाहने फुटाळा तलावा जवळील वायूसेनानगर कडे जाणाऱ्या रोडवरील टी पॉईन्ट येथे त्यांचे कडील वाहनामधून दुर्गा देवी मुर्ती खाली उतरवुन विसर्जनाच्या ठिकाणी नेतील. रिकामी झालेले वाहने सरळ वायूसेना नगर कडून टि.व्ही. टॉवर चौक, बालोद्यान (सेमिनरी हिल) मार्गे लोकभवन मागील गेट पासून आपआपल्या ठिकाणी परत जातील.

२. पोलीस तलाव

सार्वजनिक मंडळाचे दुर्गा देवी मुर्ती हे लिबर्टी चौक–छावणी वाय पॉईन्ट–दुर्गा मंदीर छावणी – जूना काटोल नाका चौक– पोलीस तलाव

३. गोरेवाडा कृत्रिम तलाव

- सार्वजनिक मंडळाचे दुर्गा देवी मुर्ती हे लिबर्टी चौक– छावणी वाय पॉईन्ट– दुर्गा मंदीर छावणी– जूना काटोल नाका चौक– गिटटीखदान चौक– बोरगाव चौक– गोरेवाडा चौक– गोरेवाडा कृत्रिम तलाव
- सार्वजनिक मंडळाचे दुर्गा देवी मुर्ती हे मानकापूर चौक– झिंगाबाई टाकळी पूलीया चौक– गोरेवाडा चौक– गोरेवाडा कृत्रिम तलाव
- मानकापूर चौकातून गोरेवाडा चौक मार्गे नवीन काटोल नाकाकडे जाणारी वाहतूक आवश्यकते प्रमाणे गोरेवाडा चौकातून डावे वळन घेउन बोरगाव चौक, गिटटीखदान चौक डावे वळन घेउन नवीन काटोल नाका मार्गे जातील.

४. कोराडी तलाव :–

अ) नागपूर शहरातील दुर्गा देवी मुर्ती व घट चे विसर्जन करण्याकरीता येणारे सार्वजनिक मंडळांचे दुर्गा देवी मुर्ती हे मानकापुर, कोराडी टी पाईंट, महादुला टी पांईट, भारत माता चौक (वंजारी भवन चौक), कोराडी तलाव नांदाफाटा येथे विसर्जना करीता येतील. व त्याठिकाणी मुर्ती विसर्जनकरीता उतरवुन विसर्जन करतील तसेच रिकामी वाहने त्याच मार्गाने परत जातील.

ब) नागपूर ग्रामीण भागातुन विसर्जनाकरीता येणाऱ्या दुर्गा देवी मुर्ती व घट नांदा फाटा मार्गे येवुन कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता येतील. व त्याठिकाणी मुर्ती विसर्जनाकरीता उतरवुन तलावात विसर्जन करतील तसेच रिकामी वाहने त्याच मार्गाने परत जातील.

नमूद अधिसूचना दिनांक २०.१०.२०२६ ते दिनांक २२.१०.२०२६ रोजी पर्यंत अमंलात राहील.

वरिल प्रकारचे निर्बंध हे अत्यावशक सेवेत असलेल्या शासकीय वाहनांना लागू राहणार नाही. ही अधिसुचना लाऊड स्पीकरने किंवा पुढे दिलेल्या कोणत्याही प्रकाराने जाहीर करावी.

सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकीकरिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

वाहतुक शाखेची प्रेसनोट–२

दिनांक २०.१०.२०२६ रोजी नागपूर शहरातील ''कस्तुरचंद पार्क'' येथे सनातन धर्म सभा, कडबी चौक, नागपूर यांच्या संयोजनाखाली (रावण दहनाचा) कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाकरिता नागपूर शहरातील हजारोंच्या सख्येने नागरिक उपस्थित राहतात. त्यामूळे नागपूर शहरात कस्तुरंचद पार्क सभोवताली

वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत रहावी. सामान्य नागरिकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये, म्हणून खालील प्रमाणे मार्गावरील वाहतूकीवर निर्बध घालण्याकरिता अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

दिनांक २०.१०.२०२६ रोजी १५.०० वाजता पासून ते रात्री २२.०० वाजेपर्यंत खालील नमूद मार्गावर सायकल व सायकलरिक्षासह सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीवर बंदी घालण्यात आलेली आहे.

अ) एल.आय.सी. चौक ते संविधान चौक

ब) कन्नमवार पुतळा ते संविधान चौक

क) फॉरेस्ट ऑफिस चौक ते संविधान चौक

ड) कस्तुरचंद पुतळा चौक (श्री मोहीनी कॉम्प्लेक्स) ते संविधान चौक

वरील मार्गावरिल वाहतुक ही खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.

१) एल.आय.सी. चौकाकडुन ते संविधान चौक मार्गे जाणारी वाहतूक एल.आय.सी. चौक येथुन लिबर्टी चौक किंवा जयस्तंभ चौक अशा दोन्ही मार्गावरून वळविण्यात येत आहे.

२) कन्नमवार पुतळा चौकामार्गे संविधान चौकामार्गे जाणारी वाहतूक कन्नमवार चौक येथुन मिठनिम दर्गाह किंवा बिशॉप कॉटन स्कुल मार्गे वळविण्यात येत आहे.

३) श्री मोहिनी कॉम्पलेक्स कडून संविधान चौकामार्गे जाणारी वाहतूक श्री मोहिनी कॉम्पलेक्स येथुन सरळ एल.आय.सी. चौक मार्गे वळविण्यात येत आहे.

४) रामझुला उड्डाणपुलावरून संविधान चौकाकडे येणारी वाहतुक हि सरळ आय.सी. चौक मार्गे वळविण्यात येत आहे.

५) फॉरेस्ट ऑफीस चौक ते संविधान चौक प्रिंन्स सावजी गल्ली मार्गाने जाणारी वाहतूक फॉरेस्ट ऑफीस चौक येथुन येणारी वाहतूक झिरो माईल टी पांईट किंवा मिठानिम दर्गा मार्गे वळविण्यात येत आहे.

६) जुना काटोल नाका ते एमएसईबी वाय पॉईन्ट आणि कल्पना टॉकीज चौक ते एमएसईबी वाय पॉईन्ट पर्यंत सदर उड्डाणपूल दिनांक २०.१०.२०२६ रोजी १५.०० वा. पासून कार्यक्रम संपेपर्यंत बंद करण्यात येणार आहे. या मार्गाने येणाऱ्या वाहन चालकांनी इतर पर्यायी मार्गाची वापर करावा.

७) ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार कर्तव्यावरिल वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना वरील मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

नमुद अधिसुचना लाऊड स्पिकरवरून किंवा पुढे दिलेल्या कोणत्याही प्रकाराने वाहतूक परिमंडळ सिताबर्डी, सदर चे पोलीस निरीक्षक यांनी जाहीर करावी.

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

(आदित्य मिरखेलकर, भापोसे)

पोलीस उप आयुक्त, वाहतूक

नागपूर शहर.